**CNR No. :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी ९५ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश XXII नियम ४ अन्वये मयत वादी क्र. ६ विरुद्ध पारीत झालेला (Abatement) चा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील वादी क्र. ६ सुभद्रा अर्जुन ठाकुर ही दि.१४.०४.२०२३ रोजी मयत झालेली आहे. तिचे वारस वादी क्र. ७ ते ११ ही यापुर्वीच सदर दाव्यात सामील आहेत. त्यामुळे वादी क्र. ६ चे नाव कमी करणे आवश्यक आहे. सदर दाव्याच्या न्यायपुर्ततेकामी वादी क्र. ६ चे नावासमोर मयत असे नमुद करुन वादी क्र. ६ हिचे नाव कमी करायचे आहे. सबब, वादी क्र. ६ विरुद्ध पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे तसेच अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता वादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. असे असले तरी वादीने केलेल्या या कृत्यामुळे प्रतिवादीचा व

परीणामी न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी न्यायाच्या कारणे वादी क्र. ६ विरुद्धचा अपशमन (Abatement) आदेश रद्दबातल करण्यासाठी खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

**-:: आदेश ::-**

१. रक्कम रु. ३००/- (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी ९५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी क्र. ६ विरुद्ध अपशमन (Abatement) आदेश, खर्चाची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) भरल्यानंतर रद्दबातल करण्यात येत आहे.

३. सदरची रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

सही/-***

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)
दिनांक – २७.०२.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.